# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

---

## वार्षिक पुष्पप्रदर्शनात नागपूर मेट्रोला ५ पुरस्कार




नागपूर: विधान भवन येथे नुकत्याच पार पडलेल्या ५१व्या वार्षिक पुष्पप्रदर्शनात महा मेट्रो नागपूरने विविध पाच श्रेणींमध्ये पाच पुरस्कार पटकावले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) उद्यान व उद्यानशास्त्र विभाग, नागपूर यांच्यावतीने या वार्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या पुष्पप्रदर्शनात एकूण ६१ स्पर्धकांनी सहभाग घेतला असून एकूण ७१७ नोंदी नोंदविण्यात आल्या होत्या.

या प्रदर्शनात टेरेस गार्डन, लँडस्केप ऑन द स्पॉट, बोन्साय, शोभिवंत वनस्पती, गुलाब, बोन्साय व सक्युलेंट्स, शासकीय व खासगी उद्याने तसेच हंगामी फुले अशा विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देण्यात आले. यामध्ये शोभिवंत वनस्पती या विभागात १३ उपश्रेणींचा समावेश होता. या स्पर्धेत विविध शासकीय तसेच अन्य संस्थांनी सहभाग घेतला होता.

नागपूर मेट्रोने चार वेगवेगळ्या श्रेणींमध्ये एकूण पाच पुरस्कार मिळवले. यामध्ये मेट्रो भवनाच्या टेरेस गार्डनसाठी प्रथम क्रमांक, लँडस्केप ऑन द स्पॉट व बोन्साय विभागात प्रत्येकी प्रथम क्रमांक तर शोभिवंत वनस्पती विभागात दोन द्वितीय क्रमांकांचे पुरस्कार मिळवले. महा मेट्रो नागपूरने गेल्या अनेक वर्षांपासून या वार्षिक पुष्पप्रदर्शनात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत पुरस्कार मिळवण्याची परंपरा कायम ठेवली आहे..